Pune Police

प्रेस नोट

**हडपसर पोलीसांकडुन अग्निशस्त्र, कोयता या घातक हत्यारासह दुचाकी वाहने चोरणाऱ्या तीन आरोपीतांना अटक**

पुणे शहरातील दुचाकी व चारचाकी वाहन चोरी व घरफोडी चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा.अप्पर पोलीस आयुक्त सो उत्तर प्रादेशिक विभाग पुणे श्री.रविंद्र सेनगावकर व मा.पोलीस उप आयुक्त सो, परि-४ पुणे शहर श्री.दिपक साकोरे, यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो, वानवडी विभाग पुणे श्री.मिलींद पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.विश्वजित खुळे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.अंजुम बागवान, यांचे सुचनानुसार हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात येत होती.

हडपसर पोलीस स्टेशन तपास पथकातील पो. शि. अमित कांबळे यांचे बातमीवरुन अधिकारी व कर्मचारी यांनी मांजरी रोड येथे नाकाबंदी करुन संशयित वाहनांची व इसमांची चेकींग करीत असताना इसम नामे १) ओमप्रकाश चंदुराम साहु वय २०वर्षे रा.तरवडेवस्ती, बालवाडी शाळे जवळ महंमदवाडी रोड, हडपसर पुणे २) जीवा अर्जुन आहिर वय ४८ वर्षे रा. ठाकूर चाळ, एकविरा पीठाचे गिरणी समोर,यशोधन नगर ठाणे वेस्ट ३) सोमनाथ शंकर खोरदे वय २४ वर्षे रा. बालाजी मंदिराशेजारी, सुधीर रामेश्वर वाळके यांचे चाळीत पाषाण पुणे यांना ताब्यात घेतले असता त्यांचे ताब्यात गावठी बनावटीचे **पिस्टल, दोन मॅग्झीन व एक लोखंडी कोयता** व **चोरलेली ॲक्टिव्हा मोटर सायकल** मिळुन आली.

अटक आरोपी यांचेकडे विश्वासात घेवुन कौशल्यपुर्ण तपास केला असता **अटक आरोपी हे सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या दुचाकी वाहनांची बारकाईने पाहणी करीत असत. त्या पैकी ज्या दुचाकी वाहनांना वाहन चालक वाहनांची चावी विसरुन गेलेले आहेत अशा वाहनांच्या चाव्या काढुन अटक आरोपीत त्या चाव्या स्वत:जवळ ठेवत असत. त्यानंतर त्या वाहनांवर बारकाईने पाळत ठेवुन वाहन चालक ज्या वेळेस डुप्लीकेट चावीने वाहन घेवुन जात असे त्यावेळेस अटक आरोपीत त्या वाहन चालकाचा पाठलाग करीत असत. वाहन चालक ते वाहन कोणत्या ठिकाणी पार्क करुन ठेवत आहे याबाबत पाहणी करुन त्यानंतर काही दिवसांनी त्या वाहनाच्या चोरलेल्या ओरिजनल चावीच्या सहाय्याने ती वाहने अटक आरोपीत यांनी चोरल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे.**

अटक आरोपी यांचेकडे चोरलेली **एकुण ०७ दुचाकी वाहने मिळुन आली. त्यामध्ये ०३ ॲक्टिव्हा, ०१ टिव्हीएस अपाची मोटर सायकल, ०१ यामाहा मोटर सायकल, ०१ हिरो डिलक्स मोटर सायकल व ०१ हिरो होंन्डा स्प्लेंडर मोटर सायकल या वाहनांचा समावेश आहे.**

वरील वाहनांबाबत खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

१) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.०४/२०१७ भादविक ३७९
२) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ८१३/२०१७ भादविक ३७९
३) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ११४०/१७ भादविक ३७९
४) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ११७७/१७ भादविक ३७९
५) वानवडी हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४३१/२०१७ भादविक ३७९

**उर्वरीत दोन मो.सा.बाबत तपास चालु आहे.**

तपास पथकातील सपोनि संदिप नारायण देशमाने, सपोनि प्रसाद लोणारे, पोलीस हवालदार युसुफ पठाण, संपत औचरे, राजेश नवले, पो.ना. प्रमोद टिळेकर, गणेश दळवी, प्रताप गायकवाड, सैदोबा भोजराव, विनोद शिवले, पो. शि.,अकबर शेख, दाऊद सय्यद.अमित कांबळे ,यांनी वरील कामगीरी केली.



